4342
11 JUL 2000

महिला व बाल कल्याणाशी संबंधीत कार्यक्रमावर जिल्हा परिषदेप्रमाणे पंचायत समित्या व ग्राम पंचायतीच्या निधीमधुन खर्च करण्या बाबत.

महाराष्ट्र शासन.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. झेडपीइ-१०९४-सीआर-२६६-०५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि. १३ ऑगस्ट १९९४.

निर्णय :- महिला व बालकांशी संबंधीत कार्यक्रमासाठी जिल्हा परिषदेने त्यांच्या निधीमधून कमीत कमी १० टक्के रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत यापूर्वीच सुचना दिलेल्या आहेत. शासनाने नुकतेच महिलांच्या विकासा संदर्भात नव्याने धोरण जाहीर केले आहे. शासनाने जाहीर केलेल्या धोरणाप्रमाणे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नापैकी १० टक्के उत्पन्न महिला व बालकांशी संबंधीत कार्यक्रमावर खर्च व्हावेत असे अपेक्षीत आहे. या संकल्पनेचा विचार करुन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, महिला व बाल कल्याणाशी संबंधीत कार्यक्रमावर जिल्हा परिषदे प्रमाणे पंचायत समिती व ग्राम पंचायतीच्या निधीमधून सुध्दा १० टक्के रक्कम खर्च करण्यात यावी यास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदांना सुचना देण्यात येत आहेत की, त्यांनी खालील बाबीपासून पंचायत समित्या व ग्राम पंचायतींना मिळणा-या एकुण उत्पन्नाच्या किमान १० टक्के रक्कम महिला व बाल कल्याणाशी संबंधीत कार्यक्रमावर खर्च करावी.

अ] <u>पंचायत समिती.</u>

१] महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनीयम १९६१ च्या कलम १५५[१]व १५५[२] अन्वये पंचायत समित्यांना मिळणा-या जमिन महसुलावरील उपकर.
२] स्थानिक उपकर सापेक्ष अनुदान.

ब] <u>ग्राम पंचायत.</u>

१] मुंबई ग्रामपंचायत अधिनीयम १९५८ चे कलम १३१[१] अन्वयें ग्राम पंचायतींना मिळणारे जमीन महसुल अनुदान.
२] उक्त अधिनियमातीले कलम १३२[अ] अन्वये ग्राम पंचायतींना मिळणारे जमिन समानिकरण अनुदान.
३] उक्त अधिनियमांच्या कलम १२७ अन्वये ग्राम पंचायतीला मिळणारे उपकर अनुदान.
४] महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनीयम १९६१ च्या कलम १५८ अन्वये ग्राम पंचायतीला मिळणारे मुद्रांक शुल्क.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-xxx
[ रा. का. पवार ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

जा. क्र. मबावि/वि. अधि./आरआर/१८०/२०००
महिला व बाल विकास विभाग, जि. प. जळगाव.
दिनांक:- २८/६/२०००.

प्रत:म. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि. प. जळगाव.
प्रत:- म. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, [बाल कल्याण]/ग्राम पंचायत विभाग, जि. प. जळगाव.
प्रत:- सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समित्या, जिल्हा-जळगाव.
प्रत:- बाल विकास प्रकल्प अधिकारी [सर्व] ए. बा. वि. से. यो. ---------जि. जळगाव.
२/- यांना माहितीस्तव व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

महिला व बाल कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, जळगाव.